<u>**वातावरणीय बदलासंबंधी राज्याचा कृती आराखडा व त्याच्या अंमलबजावणीबाबत-**</u>

# महाराष्ट्र शासन
## पर्यावरण विभाग

शासन निर्णय क्र.क्लायमेट चेंज-२००९/प्र.क्र.७७/तां.क.३
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ नोव्हेंबर,२००९.

**प्रस्तावना:**

वातावरणीय बदलासंबंधी राष्ट्रीय कृती आराखडा दिनांक ३० जून, २००८ रोजी राष्ट्रीय स्तरावर घोषित करण्यात आला. या अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर राबवावयाचे आठ महत्वाचे कार्यक्रम घोषित करण्यात आले. यात, सौर ऊर्जा, सक्षम ऊर्जा वापर उपयोगिता, सस्टेनेबल हॅबिटॅट, जल अभियान, हिमालयीन इको-सिस्टीम संतुलन, हरित भारत, शेतीचा चिरंतन विकास व वातावरणीय बदला संबंधित सखोल ज्ञान, अंतर्भूत आहेत. या आठ कार्यक्रमांबाबत राज्य स्तरावरुनही माहिती / कृती आराखडा देण्याबाबत आवाहन करण्यात आले. या अनुषंगाने राज्यात दिनांक २९ सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार माननीय मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या मंत्री महोदयांचा समावेश असलेली समिती गठित करण्यात आली. या समितीने डॉ. आर. के. पचौरी, डायरेक्टर जनरल, द एनर्जी ॲन्ड रिसोर्सेस इन्स्टिटयूट (टेरी) यांचे "वातावरणीय बदलाचा महाराष्ट्रावरील परिणाम" या विषयाबाबत सादरीकरण आयोजित केले होते. सादरीकरणानंतर वातावरणीय बदलासंबंधी महाराष्ट्रावरील परिणामांचा कृती आराखडा टेरी या संस्थेकडून करण्याबाबत ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने, टेरी या संस्थेने सादर केलेल्या अहवालानुसार मंत्रिमंडळाच्या दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत टेरी या संस्थेकडून सादर महाराष्ट्र राज्याचा वातावरणीय बदला संबंधीचा कृती आराखडा तयार करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रु. ९८ लाखाच्या खर्चास मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राष्ट्रीय स्तरावरील घोषित वातावरणीय बदलासंबधित कृती आराखडयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यावर होणारा वातावरणीय बदलासंबधित परिणाम व त्यासाठी अवलंबवायच्या धोरणासंबंधी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठीची जबाबदारी द एनर्जी ॲन्ड रिसोर्सेस इन्स्टिटयूट (टेरी) या संस्थेस या शासननिर्णयाद्वारे देण्यात येत आहे.

**"टेरी" मार्फत सादर करावयाचा कृती आराखडा -**

"टेरी" ही संस्था Met Office, U.K. यांचेसह महाराष्ट्र राज्यात वातावरणीय बदलाचा संभाव्य धोकादायक परिणाम व त्यासाठी अवलंबवयाचे धोरण याबाबत २ वर्षे कालावधीत कृती आराखडा सादर करेल, टेरी संस्थेने सादर करावयाच्या कृती आराखडयाबाबतच्या अटी व शर्ती या संबधीत संस्था सुकाणु समितीबरोबर चर्चा करुन अंतिम करेल.

**सुकाणू समिती :**

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार उपरोल्लेखित कामे टेरी या संस्थेकडून करुन घेत असताना त्याचे राज्य स्तरावरील समन्वयनासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे सुकाणू समितीचे गठन करण्यात येत आहे.-

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव | .. | अध्यक्ष |
| अप्पर मुख्य सचिव,सार्वजनिक आरोग्य | .. | सदस्य |
| प्रधान सचिव,नियोजन | .. | सदस्य |
| प्रधान सचिव, वित्त | .. | सदस्य |
| प्रधान सचिव,कृषि | .. | सदस्य |
| प्रधान सचिव, नगर विकास | .. | सदस्य |
| प्रधान सचिव,मदतकार्य व पुनर्वसन | .. | सदस्य |
| टेरी या संस्थेचे प्रतिनिधी / प्रोजेक्ट टिम | .. | सदस्य |
| विषयासंबधित तज्ञ | .. | आमंत्रीत सदस्य |
| सचिव, पर्यावरण | .. | सदस्य सचिव |

सदर समितीत मुख्य सचिव यांचे मान्यतेनूसार विविध प्रशासकीय विभाग प्रमुख वा संबंधित क्षेत्रिय यंत्रणांचे प्रतिनिधी तसेच विषयासंबंधित इतर तज्ञांना आमंत्रित सदस्य म्हणून बैठकनिहाय समाविष्ट करता येईल.

**सुकाणू समितीची कार्ये:**

१) टेरी या संस्थेत वातावरणीय बदलासंबंधी राज्य स्तरावर करण्यात येत असलेल्या कामांची कक्षा ठरविणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करणे.

२) वातावरणीय बदलासंबंधी टेरी या संस्थेकडून करण्यात येत असलेल्या प्रकल्पांच्या कामांचा वेळोवेळी आढावा घेणे व आवश्यकते नुसार त्यात बदल निर्देशित करणे.

३) वातावरणीय बदलासंबंधी टेरी या संस्थेकडून आवश्यक असलेली राज्य स्तरावरील माहिती (Data) संबंधित यंत्रणांच्या विभाग प्रमुखांशी संपर्क साधून उपलब्ध करुन देणे.

४) टेरी व राज्य शासन यांच्यात होणा-या माहितीसंबधित (Data) सर्व बाबींवर जसे - माहितीचे आदान प्रदान, माहितीचा हक्क, माहितीचे प्रमाणीकरण इत्यादी बाबत निर्णय घेणे.

५) राष्ट्रीय स्तरावर वातावरणीय बदलासंबंधी कृती आराखडयाच्या अनुषंगाने वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांचा अंतर्भाव राज्याच्या कृती आराखडा व त्याच्या अंमलबजावणी बाबींमध्ये करणे.

६) राज्याच्या वातावरणीय बदला संबंधीत विविध यंत्रणांमार्फत आतापर्यंत करण्यात येत असलेल्या कामांचा एकत्रित आढावा घेवून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीबाबत टेरी संस्थेकडून मागदर्शन घेणे.

७) राज्याच्या वातावरणीय बदलासंबंधी कृती आराखडा व त्याच्या अंमलबाजवणीच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय व आर्थिक बाबींचे समन्वयन करणे.

३ **कृती गट**

टेरी या संस्थेशी सादर करावयाच्या कृती आराखडयाबाबत समन्वय साधण्यासाठी सचिव (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली एक कृती गट स्थापन करण्यात येत आहे. त्या गटातील सदस्यांबाबत व आमंत्रित सदस्यांबाबत सचिव (पर्यावरण) हे आवश्यक तो निर्णय घेतील.

**आर्थिक भार :-**

"टेरीस" उपलब्ध करून द्यावयाच्या अर्थसहाय्याच्याबाबी पुढील प्रमाणे :-

| **बाब** | **रक्कम** (रुपये) |
|---|---|
| अहवालाचा एकूण खर्च | ८८,८४,८८५ |
| सर्व्हीस टॅक्स | ९,१५,१४३ |
| **एकूण (सर्व्हीस टॅक्ससह)** | **९८,००,०२८** |

**प्रॉजेक्ट टीम-**

या प्रकल्पासाठी टेरी या संस्थेमार्फत डॉ. आर.के. पचौरी व डॉ. लीना श्रीवास्तव हे ॲडव्हाझर म्हणून असणार आहेत. या शिवाय एकूण ६ सदस्यांचा एक ग्रुप या कामी कार्यरत रहाणार आहे. तसेच Met Office Hadley Centre (MOHC), U.K. येथील २ सदस्य आवश्यक ती माहिती टेरी यांना पुरविणार आहेत.

**अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष :-**

या प्रकल्पावर होणारा खर्च मागणी क्र.यू-४-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४,प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३,वायु व-जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना,(०२)(१३) पर्यावरण जनजागृती, शिक्षण, हवामान बदल कृति आराखडा (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५८४/०९/व्यय-१६,दिनांक ११.८.०९ अन्वये दिलेल्या अनुमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www. maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९१११७१८०२०७००१ आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वत्सा नायर सिंह

**(वल्सा आर.नायर सिंग)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव,कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव,मदतकार्य व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
डायरेक्टर जनरल, द एनर्जी ॲन्ड रिसोर्सेस इन्स्टिटयूट (टेरी)
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२-मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई,
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने.
निवडनस्ती.